RBI चे डेप्युटी गव्हर्नर उषा थोरात यांच्या अध्यक्षतेखालील उच्चाधिकार समितीकडून, १५ जुलै २०१० रोजी.

# भारताचा आंतरराष्ट्रीय व्यापार

व्यापाराचे दोन भागात वर्गीकरण:

① अंतर्गत व्यापार किंवा अंतर्देशीय व्यापार : उपप्रकार - ① घाऊक - Wholesale
② किरकोळ - Retail.

② विदेशी किंवा आंतरराष्ट्रीय व्यापार : उपप्रकार
① विदेशी : दोन भिन्न राष्ट्रांत वस्तू व सेवांची देवाणघेवाण.
② निर्यात :
③ आयात
④ पुनर्निर्यात ⇒ जेव्हा परकीय वस्तू किंवा सेवांची खरेदी स्वदेशात विक्री न करता इतर देशांना पुरविण्यासाठी केली जाते तेव्हा त्यांना पुनर्निर्यात व्यापार म्हणतात.

* विदेशी व्यापाराचे महत्त्व:

① आंतरराष्ट्रीय श्रमविभागणी : विशिष्ट प्रकारच्या वस्तूंच्या उत्पादनात विशेषीकरण (Specialisation) साधणे व त्या वस्तूंचे अधिक उत्पादन करून त्यांच्या मोबदल्यात इतर वस्तू आयात करणे हितकारक ठरते यालाच आंतरराष्ट्रीय श्रमविभागणी म्हणतात.

② विकसनशील देशांची उत्पादन क्षमताच कमी असते त्यांची आयात दोन प्रकारची :
(i) विकसनशील आयात → भांडवली वस्तूंच्या आयातीत.
(ii) निर्वाह आयात ⇒ कच्च्या मालाची आयात.

③ परकीय व्यापारामुळे वस्तूंच्या किंमती अल्पावधीत कमी जास्त होण्याची प्रवृत्ती थांबता येते.

④ नैसर्गिक साधनांचा पुरेपूर उपभोग शक्य होतो.

⑤ सांस्कृतिक देवाणघेवाण होते.

* परकीय व्यापाराचे संघटन:

① मध्यस्थ गृहे / आयात गृहे ⟹ परदेशातून आपल्या देशातील आयातदारांच्या वतीने माल आयात करणाऱ्या संस्था:-
आपल्या देशातील आयातदार —मध्यस्थगृहे— दुसऱ्या देशातील निर्यातदार
त्याबद्दल आयातदाराकडून कमिशन मिळवतात.

② निर्यात गृहे ⟹ निर्यात गृहांची मुख्य कचेरी निर्यात बंदराजवळ असते खरेदी केंद्रे किंवा खरेदी दलाल उत्पादकाकडून माल खरेदी करून निर्यात करतात.

Scanned by CamScanner

③ आयात निर्यात व्यापारी: अनेक व्यापारी व्यक्तीगत स्वरूपात किंवा भागीदारी किंवा कंपन्या स्थापून आयात निर्यात व्यवसाय करतात.

④ आयात निर्यात प्रतिनिधी : कार्य फिरत्या विक्रेत्याप्रमाणे:- आयातदार व निर्यातदारांच्या भेटी घेणे व मालाची विक्री करणे.

⑤ आयात निर्यात संघटना : एकाच प्रकारच्या मालाचे उत्पादन व व्यापार करणाऱ्या संस्था एकत्र येऊन आपली व्यापार संघटना स्थापन करतात.

⑥ उत्पादकांचा निर्यात विभाग: मोठ्या प्रमाणावर उत्पादन करणाऱ्या कंपन्या स्वतःच्या कंपनीत निर्यात विभाग काढून त्याद्वारे स्वजबाबदारीवर निर्यात करतात.

## ※ भारताचा परकीय व्यापार ※

**(I) परकीय व्यापाराचे आकारमान**: एका वर्षात झालेल्या व पैशाच्या स्वरूपात मोजलेल्या परकीय व्यापाराला त्याचे आकारमान म्हणतात. त्यात आयातीचे व निर्यातीचे आकारमान असते.

⇒ स्वातंत्र्यापूर्वी भारताची निर्यात नेहमी भारताच्या आयातीपेक्षा अधिक असायची. म्हणजेच व्यापारतोल नेहमी अनुकूल असायचा.

⇒ स्वातंत्र्यानंतर याउलट स्थिती.

⇒ स्वातंत्र्यानंतर भारताची आयात प्रचंड प्रमाणात वाढत गेली.

⇒ ——"—— निर्यात ——"——

⇒ भारताची आयात नेहमी निर्यातीपेक्षा जास्त राहिली (अपवाद १९७२-७३ व १९७६-७७) त्यामुळे व्यापारतोल नेहमी प्रतिकूल.

⇒ स्वातंत्र्यानंतर व्यापारतूट सतत वाढत गेली ⟹ कारण आयात वाढीचा दर हा निर्यात वाढीच्या दरापेक्षा नेहमी अधिकच होता.

**(II) परकीय व्यापाराची संरचना** - म्हणजे भारत कोणकोणत्या वस्तूंची आयात निर्यात करतो व त्या वस्तूंच्या आयात/निर्यातीचे एकूण आयात/निर्यातीशी प्रमाण.

⇒ सध्या भारत ६,००० वस्तूंची आयात तर ७५०० वस्तूंची निर्यात करतो.

**आयातीची संरचना** ⇒ वस्तू गटाच्या दृष्टीने - सर्वाधिक आयात इंधनाची (३४.७%) } २०१४/१५
त्याखालोखाल भांडवली वस्तूंची (११.००%)

⇒ वैयक्तिक वस्तू - i) POL- पेट्रोलियम, ऑईल, ल्युब्रिकंट्स (३०.८%)
ii) सोने व चांदी (८.७%)
iii) इलेक्ट्रॉनिक्स वस्तू (८.४%)
iv) मोती व मौल्यवान खडे (५.०%)

⟹ १९५१ पासून भांडवली वस्तूंची आयात वाढत गेली कारण i) वेगाने होणारे औद्योगिकरण ii) देशांतर्गत तंत्रज्ञान विकासात अपयश

⟹ १९५१ पासून अन्नधान्य व उपभोग्य वस्तूंची आयात कमी झाली कारण i) अन्नधान्याच्या बाबतीत स्वयंपूर्णता ii) हरितक्रांती.

Scanned by CamScanner

v) १९५१ पासून खनिज तेल, धातू, मोती, मौल्यवान खडे, खते, रसायने व औषधे ह्यांची आयात वाढली. १५०

b) निर्यातीची संरचना :
२०१४/१५
⇒ वस्तू गटांच्या दृष्टीने पाहिल्यास - सर्वाधिक निर्यात उत्पादित वस्तूंची (६६.७%)
खालोखाल पेट्रोलियम पदार्थांची (१८.५%)
कृषी व संलग्न वस्तू (१२.७%)

⇒ वैयक्तिक वस्तुनुसार :
i) खडे व दागिने (१३.३%)
ii) वाहतूक साहित्य (५.९%)
iii) यंत्रसामग्री व साधने (५.९%)
iv) तयार कपडे (५.४%)
v) धातू वस्तू. (५.४%)

ii, iii, iv : अभियांत्रिकी वस्तू म्हटले जाते. एकूण (१९.२%) २००४-०५ पासून सर्वाधिक निर्यात.

## (II) परकीय व्यापाराची दिशा

- आयात देश व त्यांचे एकूण आयातीशी प्रमाण } दिशा
  निर्यात देश व त्यांचे एकूण निर्यातीशी प्रमाण
  सध्या २०० देशांकडून आयात व २०० देशांना निर्यात.

आयात व्यापाराची दिशा | २०१४ - १५ | निर्यात व्यापाराची दिशा :

| आयात | निर्यात |
| --- | --- |
| • एकूण आयात : ४६८.०३ अब्ज $ | ३१०.३४ अब्ज $ |
| • प्रदेशनिहाय - i) आशिया व आशियान (५८.५%) | i) आशिया व आशियान (४९.६ %) |
| ii) युरोप (१६.५) | ii) उ. व द. अमेरीका (१३) |
| iii) उत्तर व लॅटिन अमेरीका (१२.५) | iii) युरोप (१८.१) |
| iv) आफ्रिका (८.६) | iv) आफ्रिका (१०.६) |
| v) सीआयएस व बाल्टिक राष्ट्रे (१.७) | v) सी आय एस व बाल्टिक राष्ट्रे (१.१) |

* भारताची आयात व निर्यातीत सर्वाधिक वाटा आशिया व आशियान देशांचा आहे ~~(आशिया आहे)~~.
* — " — सर्वात कमी वाटा सीआयएस व बाल्टिक राष्ट्रे यांचा.
( सीआयएस - कॉमनवेल्थ इंडिपेन्डन्ट कंट्रीज )

| आयात | निर्यात |
| --- | --- |
| देशनिहाय : i) चीन (१२.५%) | i) यु एस ए (१३.७%) |
| ii) सौदी अरेबिया (६.३%) | ii) यु.ए.ई (१०.६%) |
| iii) यु.ए.ई. (५.८%) | iii) हाँगकाँग (४.४%) |
| iv) यु.एस.ए. (४.९%) | iv) चीन (३.९%) |
| | v) सौदी अरेबिया (३.६%) |

* आयातीत सर्वाधिक वाटा चीनचा तर निर्यातीत यु.एस.ए. चा आहे.

Scanned by CamScanner

## सेवांचा परकीय व्यापार

जागतिक व्यापार संघटनेच्या GATS करारांतर्गत 161 व्यापारयोग्य सेवांचा समावेश.

अ) सेवांची निर्यात ⟹ 2014-15 — 155.6 अब्ज $
- संगणक सेवांचा प्रथम क्रमांक
- त्याखालोखाल सेवा – प्रवास सेवा व वाहतूक सेवा
- सर्वाधिक निर्यात अमेरिका व नंतर यु.के.

ब) सेवांची आयात ⟹ 2014-15 — 81.11 अब्ज $
- व्यवसाय सेवांचा प्रथम क्रमांक.
- त्याखालोखाल प्रवास सेवा व वाहतूक सेवा.

} सेवांच्या व्यापाराबाबत नेहमी व्यापारशेष

## भारताचे सर्वात मोठे परकीय व्यापारातील भागीदार देश

2015-16 मध्ये प्रमुख 5 देशांचा एकूण व्यापारातील हिस्सा ⟹ 35.04 %

15 ——"—— ⟹ 50.06 %

25 ——"—— ⟹ 63.02 %

* सर्वात मोठा व्यापारी भागीदार – चीन. त्याखालोखाल यु.एस.ए. व यु.ए.ई. व सौदी अरेबिया

(यु.ए.ई. व सौदी अरेबिया ⟹ कच्च्या तेलाची आयात व शुद्ध पेट्रोलियम पदार्थांची निर्यात)

सर्वाधिक व्यापारशेष ⟹ युएसए, यु.ए.ई., हाँगकाँग, सिंगापूर, फ्रान्स.

व्यापारतूट ⟹ चीन, स्वित्झर्लंड व सौदी अरेबिया.

## भारताचे जागतिक व्यापारातील स्थान.

1950 साली ⟹ 1.02%

2005 ⟹ 1.68%

WTO च्या World Trade Report 2015 नुसार 2014 साली हिस्सा खालीलप्रमाणे. क्रम.

1. जागतिक वस्तू निर्यात ⟹ हिस्सा 1.6 % (क्रमांक 19 वा) ⟶ चीन, युएसए, जर्मनी.
2. जागतिक ~~वस्तू~~ ~~निर्यात~~ आयात ⟹ 2.8% (क्र 12 वा) ⟶ युएसए, चीन, जर्मनी.
3. जागतिक ~~वस्तू~~ सेवा निर्यात ⟹ 3.2% (क्र 8 वा) ⟶ युएसए युके, जर्मनी
4. जागतिक सेवा आयात. ⟹ 2.6% (क्र 10 वा) ⟹ युएसए, जर्मनी, चीन.

## राज्यस्तरीय निर्यात

1. गुजरात – (23.5%)
2. महाराष्ट्र (22.3%)
3. तामिळनाडू (8.6%)
4. कर्नाटक (5.6%)

} या चार राज्यांचा निर्यातीतील वाटा 60% पेक्षा अधिक. गुजरात व महाराष्ट्राचा वाटा जवळपास 50% इतका.

राज्यामार्फत होणाऱ्या निर्यातीस प्रोत्साहन देण्यासाठी (Assistance to States for developing Export Infrastructure & Allied Activities) ASIDE ही योजना.

Scanned by CamScanner

# * भारताचे परकीय धोरण *

1) स्वातंत्र्यपूर्व धोरण → १९२३ पर्यंत ब्रिटिशांकडून मुक्त व्यापार धोरण.
→ १९२३ नंतर विभेदात्मक धोरणाचा अवलंब
⇒ १९२९ - जागतिक मंदीचा व्यापारावर प्रभाव
⇒ १९३२ – ब्रिटिश सरकारचे साम्राज्यवादी धोरण
⇒ दुसरे महायुद्ध — आयात-निर्यातीवर कडक प्रतिबंध

2) स्वातंत्र्योत्तर धोरण ⇒ भारतीय व्यापाराच्या विदेशीकरणाची प्रक्रिया सुरु
⇒ देशी उद्योगांना संरक्षण करण्याच्या उद्देशाने आयात धोरण जाहीर
⇒ त्यामध्ये आयातीवर नियंत्रण, आयात पर्यायीकरण यावर भर
⇒ तिसऱ्या पंचवार्षिक योजनेपर्यंत परकीय धोरण आयात पर्यायीकरणावर केंद्रित.
⇒ १९६२ – परिक्षणासाठी - मुदलियार समिती.
⇒ तिसऱ्या योजनेच्या मध्यावधी निर्यात वृद्धी धोरण अनुसरण्याचा निर्णय.
कारण i) परकीय व्यापार तूट
ii) व्यवहार तोल संकट
⇒ १९७० मध्ये प्रथमच निर्यात धोरणाची घोषणा (मुदलियार समितीने शिफारस)
आयात व निर्यात धोरण स्वतंत्रपणे.
⇒ १९८१ - संयुक्त आयात निर्यात धोरण.
⇒ १९८४ - नियोजन आयोगाचे सदस्य आबिद हुसेन यांच्या अध्यक्षतेखाली
समिती — त्यांच्या शिफारशीनुसार
⇒ १९८५ - प्रथमच त्रिवार्षिक आयात-निर्यात धोरण जाहीर (वाणिज्यमंत्री-V.P.सिंग)
⇒ या धोरणात प्रथमच निर्यातवृद्धी केंद्रस्थानी ठेवून पास बुक योजना जाहीर.
⇒ १९९२ : पहिले पंचवार्षिक आयात-निर्यात धोरण : (१९९२-९७) वा.मंत्री-पी.चिदंबरम
उद्देश ⇒ उदारीकरण व स्वावलंबन
आयात निर्यातीसाठी नकारात्मक सूची
निर्यात वृद्धीसाठी - फोकस लॅटीन अमेरीका.
⇒ १९९२ पासून EPCG योजना
⇒ १९९७- दुसरे पंचवार्षिक आयात-निर्यात धोरण. (९७-०२) वा.मंत्री-V.V.रमैय्या
१९९८ मध्ये NDA सरकारने काही बदल केले.
९७ - आधिकार शुल्क पास बुक योजना (DEPB) सुरु
२००० - विशेष आर्थिक क्षेत्र योजना: (SEZ)

Scanned by CamScanner

⇒ फोकस सी आय एस योजना.

२००२ ⇒ तिसरे पंचवार्षिक आयात निर्यात धोरण (२००२-२००७)

२००४ ⇒ नवीन UPA कॉंग्रेसने बदल करून २००४ ते २००९ नवीन परकीय व्यापारी धोरण.

२००९ ⇒ चौथे पंचवार्षिक आयात निर्यात धोरण - वा.मंत्री ⇒ आनंद शर्मा - २००९-२०१४

२०१५ ⇒ पाचवे पंचवार्षिक आयात निर्यात धोरण - वा मंत्री ⇒ निर्मला सितारामन २०१५-२०

## * परकीय व्यापार धोरण २००४-०९ *

→ UPA-सरकार - २००४ ते ०९ - आयात-निर्यात धोरण नाव बदलून परकीय व्यापार धोरण.

**वैशिष्ट्ये:**

i) २००९ पर्यंत भारताचा जागतिक व्यापारातील हिस्सा १.५% पर्यंत वाढवणे.

ii) निर्यातीच्या पाच परंपरागत क्षेत्रावर: कृषी, हस्तकला वस्तू, हातमाग, चामड्याच्या वस्तू आणि मौल्यवान खडे व दागिने.

iii) संपूर्ण निर्यात क्षेत्राची सेवा करापासून मुक्तता.

iv) निर्यातदाराचा दर्जा मिळविण्यासाठी मर्यादा ४५ कोटीवरून १५ कोटी.
निर्यात समुहांना Town of Export Excellence चा दर्जा मिळविण्यासाठी १००० कोटी रु वरून २५० कोटी.

v) विशेष आर्थिक क्षेत्रांच्या धर्तीवर मुक्त व्यापार व वखार क्षेत्र (FTWZ - Free Trade Warehousing Zones) बंदरे व विमानतळे इ. जवळ

vi) जैव तंत्रज्ञान पार्कची स्थापना.

vii) ३ नवीन योजना:
1) टारगेट प्लस योजना - निर्यातीच्या लक्ष्यापेक्षा अधिक निर्यात करणाऱ्यांना करमुक्त वित्तपुरवठा.
2) विशेष कृषी उपज योजना: कृषी वस्तूंच्या निर्यातीस चालना देण्यासाठी करमुक्त वित्त पुरवठा.
3) सर्व्हड फ्रॉम इंडिया योजना: मोठ्या प्रमाणात परकीय चलन ~~पुरवठा~~ कमावणाऱ्या सेवा निर्यातदारांना करमुक्त वित्त पुरवठा.

viii) सेवा निर्यातीसाठी नविन 'सर्व्हिस एक्स्पोर्ट प्रमोशन कौन्सिल' स्थापना.

→ या योजनेदरम्यान ३ वेळा वार्षिक पुरक धोरण: २००५-०६, ०६-०७, ०७-०८ - २००६-०७ मध्ये टार्गेट प्लस योजना रद्द: त्याऐवजी ① फोकस प्रॉडक्ट ② फोकस मार्केट. उद्देश ग्रामीण भागात रोजगार संधी उपलब्ध करून देण्यासाठी.

⇒ विशेष कृषी उपज योजनेचे नाव बदलून ⇒ विशेष कृषी आणि ग्रामोद्योग योजना.

Scanned by CamScanner

## * परकीय व्यापार धोरण २००९ ते २०१४ *

उद्दिष्ट : i) वैश्विक मंदीच्या काळात निर्यातीतील घसरण रोखणे.
ii) मंदीमुळे प्रभावित क्षेत्रांना अतिरिक्त सहाय्य.

मुख्य लक्ष्ये - i) निर्यातीतील घसरण रोखणे.
ii) मार्च २०११ पर्यंत २०० अब्ज डॉलर व १५% वार्षिक निर्यात वृद्धी.
iii) २०१४ - निर्यात दुप्पट करणे २५% वार्षिक निर्यात वृद्धी.
iv) २०२० पर्यंत आंतरराष्ट्रीय व्यापारातील भारताचा हिस्सा दुप्पट करणे.

वैशिष्ट्ये: १) फोकस मार्केट स्किम अंतर्गत २६ नवीन बाजारपेठा.
२) नवीन वस्तूंचा समावेश.
३) १००% निर्यात प्रधान उद्योग व सॉफ्टवेअर टेक्नॉलॉजी पार्कस मधील उद्योगांना आयकर सूट - २०१०-११ मध्येही लागू.
४) हिऱ्यांचे खरे बाजार स्थापन करण्याचे ठरविण्यात आले.

## * परकीय व्यापार धोरण २०१५-२० *

→ भारताचा जागतिक व्यापारातील हिस्सा सध्याच्या ३% हून दुप्पट करणे.

→ नवीन योजना:

① भारतातून वस्तू निर्यात योजना: (Merchandise Export from India Scheme) (MEIS)
पुढील पाच योजनांचे एकत्रिकरण. i) फोकस प्रॉडक्ट स्किम
ii) फोकस मार्केट स्किम
iii) मार्केट लिंक्ड फोकस प्रॉडक्ट स्किम.
iv) विशेष कृषी व ग्रामोद्योग योजना
v) ॲग्री इन्फ्रास्ट्रक्चर इन्सेंटिव्ह स्क्रिप.

② भारतातून सेवा निर्यात योजना (Services Export from India Scheme) (SEIS)
सर्व्हड फ्रॉम इंडियाची पुनर्रचना करून.

## * निर्यात प्रोत्साहनाच्या काही योजना *

① EPCG - Export Promotion Capital Goods Scheme = 1992
भांडवली वस्तू वर शून्य सीमा शुल्क (आयातीवर)
अट - सीमा शुल्काच्या ६ पटीने अधिक मूल्याची निर्यात पुढील ६ वर्षात करणे बंधनकारक

② DFIA - Duty Free Import Authorisation Scheme -
निर्यात वस्तूंच्या उत्पादनासाठी लागणाऱ्या इंधन, तेल, ऊर्जा स्रोत, उत्प्रेरक इ. आदानांची शुल्कविरहीत आयात.

Scanned by CamScanner

## * निर्यात प्रक्रीया क्षेत्र * (EPZ's) Export Processing Zones

⇒ सुरुवात - 1965

⇒ सात EPZ's निर्माण केले: ① कांडला (गुजरात)
② सांताक्रुझ (मुंबई)
③ नोयडा (उ.प्र)
④ विशाखापट्टनम (आं.प्र)
⑤ फाल्टा (कोलकाता)
⑥ कोचीन (केरळ)
⑦ चेन्नई (ता नाडू)

## * विशेष आर्थिक क्षेत्र * (SEZ's) Special Economic Zones

⇒ 2000 रोजी ⇒ नवव्या योजनेला समांतर ⇒ परकीय आयात निर्यात धोरण 97-02

सेझची निर्मिती चीनमधील सेझच्या धर्तीवर.

**योजना:**

① या क्षेत्रावरील उद्योग आपले सर्व उत्पादन निर्यात करणार असतील तर सर्व आयात निर्यात संबंधी नियम व नियंत्रणापासून मुक्त.

② परकीय व्यापार व कर आकारणी याद्दृष्टीने सेझच्या प्रदेशांना - परकीय प्रदेश - म्हटले गेले सेझच्या बाहेरील प्रदेशाला 'देशी प्रशुल्क क्षेत्र' म्हणून संबोधले जाईल.

③ सेझ ⟶ उद्योग वस्तू व सेवा निर्मितीसाठी.

④ यामधील उद्योगांनी 5 वर्षात निव्वळ परकीय चलन कमविणारे बनणे अपेक्षित.

⑤ आयात/निर्यात मालाची कस्टमामार्फत होणारी नेहमीची तपासणी कमी करण्यात येईल.

⑥ सेझ मध्ये 100% परकीय प्रत्यक्ष गुंतवणूकीस (FDI- Foreign Direct Investment) मान्यता.

⑦ निर्यात उत्पन्नावर पहिल्या 5 वर्षासाठी 100 टक्के, पुढील 2 वर्षासाठी 50 टक्के.

⑧ सेझमध्ये उद्योग - i) सार्वजनिक क्षेत्रात ii) खाजगी क्षेत्रात iii) संयुक्त iv) राज्य सरकार

⑨ सेझसाठी किमान व कमाल क्षेत्रफळ: SEZ Act 2005 नुसार किमान क्षेत्रफळाचे लक्ष्य ठेवण्यात आले आहे मात्र कमाल क्षेत्रफळाचे बंधन घालण्यात आलेले नाही.
(कमाल क्षेत्रफळ ठरविण्याचा अधिकार राज्य सरकारांना)

क्षेत्रफळाच्या किमान मर्यादा:

i) बहुवस्तू सेझ ⟹ 1000 हेक्टर

ii) बहु सेवा -''- ⟹ 100 हेक्टर

iii) IT सेझ ⟹ 10 हेक्टर ⟹ बांधकाम 1 लाख चौ.मी.

iv) रत्ने व दागिने ⟹ 10 हेक्टर ⟹ 50 हजार चौ.मी.

v) जैवतंत्रज्ञान ⟹ 10 हेक्टर ⟹ 40 हजार चौ.मी.

vi) मुक्त व्यापार व वखार विभाग ⟹ 40 हेक्टर ⟹ 1 लाख चौ.मी.

Scanned by CamScanner

* सेझच्या स्थापनेसाठी संमती व्यवस्था :
  - एक खिडकी संमती यंत्रणा. — १९ सदस्यीय आंतरमंत्रिय संमती मंडळ.
    मंडळाचे अध्यक्ष = केंद्रिय व्यापार विभाग सचिव
    मंडळाच्या संमतीनंतर अधिसूचना केंद्रसरकारमार्फत
  - अधिसूचना मिळाल्यानंतर SEZ मध्ये उद्योग स्थापन करण्याची संमती
    झोनल स्तरावर — पदसिद्ध अध्यक्ष डेव्हलपमेंट कमिशनर.

* विशेष आर्थिक क्षेत्र कायदा ; २००५ . (SEZs Act 2005)

→ २००५ मध्ये संमत — २००६ रोजी अंमलात.

महत्वाच्या तरतुदी ⇒
① सेझच्या विकासकांना सेझ च्या विकासासाठी सीमा शुल्क व अबकारी करापासून मुक्तता.
② आवश्यक वस्तूंची विनाशुल्क आयात.
③ निर्यातीतून कमावलेल्या उत्पन्नावर ५ वर्षांसाठी १००% तर पुढील ५ वर्षांसाठी ५०% आयकर माफ.
④ सेझमधील उद्योग किमान पर्यायी कर (MAT) विक्री कर तसेच सेवा कर यातून मुक्त. तसेच राज्य विक्री करातून मुक्तता.
⑤ ५०० दशलक्ष बाह्य व्यापारी कर्ज घेण्यास संमती.
⑥ SEZ मधून देशात विक्री करण्यास मनाई नाही मात्र लागू असलेले कर भरावे लागतील.
⑦ नवीन कायद्याने निर्यात करावीच हे बंधन नाही. मात्र ५ वर्षांत निव्वळ परकीय चलन कमविणारे बनावे.
⑧ १०० % FDI मान्यता.
⑨ सेझ मध्ये स्थापन झालेल्या बँकांना १० वर्षांसाठी आयकर मुक्तता.

सेझची सद्यस्थिती : (२०१८ जाने)

- विशेष आर्थिक क्षेत्र कायदा २००५ संमत करण्यापूर्वी केंद्रसरकारचे ७ } १९ सेझ.
  राज्यसरकार/किंवा खाजगी १२
- सध्या हे १९ धरून मान्यता मिळविलेले ४०५ सेझ — कर्नाटक ६२, महाराष्ट्र ५५, तेलंगणा ५२
- ४०५ पैकी ३३१ च्या अधिसूचना यांपैकी महाराष्ट्र ५०, तामिळनाडू व तेलंगणा ४६
- ३२ सेझना तत्वत: मान्यता — पैकी महाराष्ट्रात ११
- ४०५ पैकी २५८ (६१%) माहिती तंत्रज्ञान क्षेत्रात.
- जाने २०१८ मध्ये कार्यरत सेझ — २०६ — केंद्रसरकारची ७ व इतर खाजगी/राज्य सरकारची.

Scanned by CamScanner

## * कृषी निर्यात क्षेत्र *
## (Agricultural Export Zones - AEZ's)

⇒ 2001 च्या आयात निर्यात धोरणाने ही संकल्पना मांडली.

⇒ विशिष्ट भौगोलिक क्षेत्र व विशिष्ट कृषी वस्तूवर लक्ष केंद्रित करणे हे उद्दिष्ट.

⇒ कार्याचे सुसूत्रीकरण घडवून आणण्यासाठी - APEDA ही नोडल एजन्सी.
(APEDA - Agricultural Produce Export Development Agency)

⇒ कृषी प्रक्रियेचे पूर्ण एकात्मीकरण: → कच्चा माल विकास, उत्पादन, प्रक्रिया, पॅकेजिंग व निर्यात

⇒ केंद्र शासनाने सुमारे 40 कृषी वस्तूंशी संबंधीत 60 AEZ's ना संमती दिली - 20 राज्यांत

महाराष्ट्रात :-

① द्राक्षे व ग्रेप वाईन → नाशिक, सांगली, पुणे, सातारा, नगर, सोलापूर.
विंचूर (नाशिक), पलूस (सांगली) ग्रेप वाईन पार्क्स.

② हापूस आंबा → रत्नागिरी, सिंधुदुर्ग, ठाणे व रायगड.

③ केशर आंबा → औरंगाबाद, जालना, बीड, लातूर, नगर व नाशिक.

④ फुले → पुणे, नाशिक, कोल्हापूर, सांगली. तळेगाव (पुणे) येथे फ्लोरिकल्चर पार्क

⑤ कांदा → नाशिक, अहमदनगर, पुणे, सातारा, सोलापूर

⑥ डाळिंब → सोलापूर, सांगली, नगर, पुणे, लातूर

⑦ केळी → जळगाव, धुळे, नंदूरबार.

⑧ संत्री → नागपूर, अमरावती.

## * दर्जा धारक योजना *

* निर्यातीचे व परकीय चलन प्राप्तीचे निकष पूर्ण करणाऱ्या उद्योगसंस्थांना निर्यातगृह म्हणून दर्जा.
दर्जाचे पाच गट ⟹ त्यानुसार सवलती.
तीन वर्षांपैकी किमान दोन वर्षांमध्ये पुढील लक्ष्य पूर्ण करणे गरजेचे

① एक स्टार निर्यातगृहे - 3 कोटी
② दोन स्टार -"- 25 कोटी
③ तीन स्टार -"- 100 कोटी
④ चार स्टार -"- 500 कोटी
⑤ पाच स्टार -"- 2000 कोटी

## * निर्यात वृद्धी औद्योगिक पार्क्स *
Export Promotion Industrial Parks → EPIP's.

सुरुवात - ऑगस्ट 1994 — केंद्र पुरस्कृत.

राज्य सरकारांना निर्यातप्रधान उत्पादनासाठी पायाभूत सुविधा निर्माण करण्यासाठी 75% अनुदान (10 कोटीपर्यंत)

Scanned by CamScanner

⇒ आजपर्यंत २५ EPIP'S स्थापन्यास मान्यता.
पहिला सितापूर- जयपूर (राजस्थान) — १९९७.
⇒ पूर्ण झालेले EPIP'S ⇒ ① बंगलोर (कर्नाटक) ⑤ गुम्मीडिपुंडी - (ता-नाडू)
② अंबरनाथ (महा) ⑥ पशामीलारम ( आंध्र)
③ काकीनाड (केरळ) ⑦ अमीनगाव (आसाम)
④ सूरजपूर (उ प्रदेश)

## ※ निर्यात विकास केंद्र ※
## ( Export Development Centres )

१९९५-९६ — २३ निर्यात विकास केंद्र निश्चीत केली. — ५०,००० कोटी रु गुंतवणूक योजना.

① तिरुपूर — होजिअरी विणकाम
② मोरादाबाद — पितळेची भांडी
③ लुधीयाना - जड यंत्रे व होजिअरी
④ सुरत — खडे व दागिने
⑤ पानिपत — हॅन्डलूम कापड
⑥ अलेप्पी - नारळ व काथ्या
⑦ जालंधर - खेळ साहित्य
⑧ पानीपत - बेडर वस्तू
⑨ नागपूर - तेनाने तयार उपकरणे
⑩ विशाखापट्टणम - माले व मत्स्यपदार्थ
⑪ मिरत - खेळ साहित्य.
⑫ अलिगड - पितळी कुलूपे
⑬ आग्रा - लेदरचे बूट/चपला.
⑭ खुर्जा - मातीची भांडी.
⑮ कांचीपुरम - सिल्क
⑯ सलेम — तेनाने तयार वस्तू.
⑰ शिवकाशी - आगपेट्या
⑱ अंबाला - शास्त्रिय उपकरणे.
⑲ राजकोट - इंजिन पंप.
⑳ वापी - रसायने
㉑ जामनगर - पितळी ब्रास पार्टस.
㉒ बटाला - मशीन उपकरणे
㉓ भागलपूर - विणकाम.

## ※ परकीय व्यापाराशी संबंधित संस्था ※

① भारतीय राज्य व्यापार महामंडळ. (STCI- State Trading Corpo of India)
— सार्वजनिक क्षेत्र - स्थापना - १९५६ — नवी दिल्ली.
② भारतीय परकीय व्यापार संस्था - (IIFT - Indian Institute of Foreign Trade)
सार्व क्षेत्र - १९६४ — नवी दिल्ली.
③ सागरी उत्पादने निर्यात विकास प्राधिकरण (MPEDA - Marine Products Export Development Autho)
सार्व क्षेत्र - १९७२ - कोचीन
④ कृषी व प्राक्रिया अन्न उत्पादने निर्यात विकास प्राधी (APEDA)
सार्व क्षेत्र १९८६
⑤ भारतीय पॅकेजिंग संस्था ( IIP - Indian Institute of Packaging)
सार्व क्षेत्र - १९६५ — मुंबई
⑥ खनिजे व धातू व्यापार महामंडळ - (MMTC - Mineral & Metals Trading Corporation)
सार्व क्षेत्र १९६३ — नवी दिल्ली.

Scanned by CamScanner